मुख्य कार्यकारी अधिकारी, महा-राकावि सोसायटी, मुंबई यांच्या अधिनस्त कार्यालया अंतर्गत गट-अ संवर्गातील विशेषज्ञ अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्यांबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः बदली-२०२६/प्र.क्र.१३०/राकावि (ई-१६६७४९५)
गो.ते.रुग्णालय इमारत,१० मजला, ए विंग,
मंत्रालय, मुंबई -४०० ००१
दिनांक : ३० जुन,२०२६

शासन आदेश -

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (४), ४ (५) आणि कलम ६ मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने मुख्य कार्यकारी अधिकारी, महा-राकावि सोसायटी, मुंबई यांच्या अधिनस्त कार्यालया अंतर्गत गट-अ संवर्गातील विशेषज्ञ (वेतनस्तर एस-२३: ६७७००-२०८७०० व एस-२० : ५६१००-१७७५००) यांची त्यांच्या नावा समोरील स्तंभ-४ मध्ये दर्शविलेल्या पदावर प्रशासकीय कारणास्तव बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे:-

अ.क्र	अधिकाऱ्याचे नांव	सध्याची पदस्थापना	बदलीने पदस्थापना
१	२	३	४
१	**डॉ. वैशाली बेले,** भिषक (उरो)	रुग्णालय वरळी	**रुग्णालय, मोहननगर, पुणे**
२	**डॉ. मीनाक्षी दे. राठोड,** स्त्रीरोग व प्रसुती शास्त्रज्ञ	रुग्णालयछ.संभाजीनगर	**रुग्णालय कांदिवली**
३	**डॉ. शशी गोविंदराव कोळनूरकर,** कान, नाक, घसा तज्ञ	रुग्णालय, मुलुंड	**रुग्णालय कांदिवली**
४	**डॉ. वसंत व्ही. भोजने,** बधिरीकरण शास्त्रज्ञ	रुग्णालय नाशिक	**रुग्णालय कांदिवली**
५	**डॉ. लक्ष्मण परशरामजी शिंदे,** शरिरविकृती शास्त्रज्ञ	रुग्णालय मुलुंड	**रुग्णालय संभाजीनगर**
६	**डॉ. सचिन र. गवळी,** निवासी शरिरविकृती शास्त्रज्ञ	रुग्णालय नाशिक	**रुग्णालय वाशी**
७	**डॉ. केतन एम. छेडा,** रक्त संक्रमण अधिकारी	रुग्णालय वरळी	**रुग्णालय, उल्हासनगर**

२. सदरील बदली आदेश तात्काळ अंमलात येतील.

३. बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्यास त्यांच्या नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्या करीता पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे आणि संबंधित अधिकाऱ्याने त्यांना दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी त्वरीत हजर होऊन त्याबाबतचा अहवाल संचालक (प्रशासन), महा-राकावि सोसायटी, मुंबई यांना व शासनास सादर करावा.

४. बदली झालेल्या अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करण्यात येऊ नये, अन्यथा रजा मंजूर करणाऱ्या संबंधित प्राधिकाऱ्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

५. बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी त्यांना कार्यमुक्त केल्यानंतर, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, परकीय सेवा आणि निलंबन) नियम-१९८१ मधील नियम-१० अनुसार अनुज्ञेय पदग्रहण अवधीत नवीन पदस्थापने च्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. तसेच, जे अधिकारी या कालमर्यादेचे पालन करणार नाहीत आणि पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न होता परस्पर गैरहजर राहतील, अशा अधिकाऱ्यांची अनुपस्थिती "अनधिकृत अनुपस्थिती" म्हणून समजण्यात येईल व पर्यायाने त्यांच्या सेवेत खंड होईल, याची जाणीव सर्व संबंधितांना करुन देण्यात येत आहे.

६. जे अधिकारी त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होणार नाहीत, त्यांचेविरुध्द आयुक्तालयाने वेळीच शिस्तभंग विषयक कारवाई सुरु करुन त्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा.

७. सदरहू बदलीच्या आदेशात बदल करुन घेण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे अधिकारी शिस्तभंग विषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.

८. सदर आदेशामधील बदली झालेल्या अधिकाऱ्याची सेवा शासनाची तथा सक्षम प्राधिकारी यांची मान्यता न घेता प्रतिनियुक्तीने, उसनवारीने वा कामासाठी परस्पर अन्य ठिकाणी वर्ग केली जाणार नाही, याची मुख्य कार्यकारी अधिकारी, महा-राकावि सोसायटी, मुंबई यांनी काटेकोरपणे दक्षता घ्यावी. अशी बाब निदर्शनास आल्यास संबंधित जबाबदार अधिकारी यांच्याविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळा वर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६३०१४५६३३४२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHANDRAKANT HARIDAS WADE

Digitally signed by CHANDRAKANT HARIDAS WADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=fda96a8ca4dd3ecbdbbe4b156e5eaa93f60f3e037cbbbbdefe9e2961f45f0960, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9474E7143B2BC3FD96E8D7BF07D1CE51DE8461D4C34AE1E3F643C11B54523936, cn=CHANDRAKANT HARIDAS WADE
Date: 2026.06.30 23:00:29 +05'30'

(चंद्रकांत ह. वडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, महा-राकावि सोसायटी, मुंबई

२) संचालक (वैद्यकीय/प्रशासन), महा-राकावि सोसायटी, मुंबई
३) वैद्यकीय प्रशासन अधिकारी (सर्व), राज्य कामगार विमा योजना,
४) वैद्यकीय अधिक्षक (सर्व), राज्य कामगार विमा योजना रुग्णालय,
५) महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र - १ , मुंबई /महाराष्ट्र - २, नागपूर
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र - १ , मुंबई /महाराष्ट्र - २, नागपूर
७) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
८) संबंधित अधिकारी (संचालक (प्रशासन), महा-राकावि सोसायटी, मुंबई यांचेमार्फत)
९) निवड नस्ती (राकावि)

प्रत-

१) मा.मंत्री (आरोग्य) / मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव
२) सचिव (१) व (२), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
३) उप सचिव (राकावि), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक